# बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये “कोविड -१९” या रोगाचा प्रार्दुभाव वाढत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयात “कोविड-१९” बाधीत रूग्णांकरीता उपचार सुरू असलेल्या रूग्णालयामध्ये सुरक्षा विषयक सेवा देण्याकरीता **“ कंत्राटी सुरक्षा रक्षक ”** हि पदे माजी सेवानिवृत्त सैनिकांमधून फक्त सहा महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेच्या साक्षांकित छायांकित प्रती व अलिकडेच काढलेले पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र अर्जावर चिकटवून विहित नमुन्यातील अर्ज दिनांक २५/०४/२०२० ते दिनांक २८/०४/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत **बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, गेट क्रमांक -७, फोर्ट, मुंबई-४०० ००१ किंवा** cso.security@mcgm.gov.in **या ई-मेल वर सादर करावेत.**

दिनांक २८/०४/२०२० रोजी सायं. ६.०० यावेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही अथवा त्या बाबतचा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांकः ०२२-२४९२ २७७२.

कंत्राटी पध्दतीने सहा महिन्यांकरीता भरावयाची पदे.

| अ.क्र. | संवर्ग | एकुण पदे | निश्चित ठोक प्रति माह वेतन |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक | ३२० | रूपये २५,०००/- |

शैक्षणिक अर्हताः

1) दहावी पास (१०० गुणांच्या मराठी विषयासहीत)

वयोमर्यादाः

उमेदवाराचे वय दिनांक २५/०४/२०२० रोजी किमान २० वर्षे असावे व कमाल ३८वर्षांपेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीय उमेदवाराकरीता वय ४३ वर्षे.)

माजी सेवानिवृत्त सैनिकांसाठी सशस्त्र दलात किमान सहा महिने सेवा केलेल्या माजी सेवानिवृत्त सैनिकांनी सशस्त्र दलात केलेल्या अखंड सेवे इतका कालावधी अधिक तीन वर्षे येवढा कालावधी त्यांच्या विहित दिनांकातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

सर्वसाधारण अटीः

1) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
2) निवड झालेल्या उमेदवाराविरूध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही, असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्यामधून नेमणूकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.
3) उमेदवार नोकरी करीत असल्यास पुर्वीच्या संस्था मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
4) माजी सेवानिवृत्त सैनिकांनी अर्जासोबत माजी सेवानिवृत्त सैनिक असल्याबाबतचे कागदपत्रे सोबत जोडावीत. तसेच मुलाखतीसाठी येताना सदर कागदपत्रांच्या मूळ / सांक्षाकित छायांकित प्रती सह उपस्थित रहावे.
5) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा करारानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्यबादल करण्यात येईल. तसेच करार झालेला असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांचा करार समाप्त करण्यात येईल.
6) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस / कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचे अधिकार म.न.पा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

7) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
8) सदर कंत्राटी तत्वावरील करार कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता रद्द करण्याचे अधिकार म.न.पा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.
9) सदर कंत्रांटी तत्वावरील करार कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचा करार तात्काळ रद्द करण्यात येईल.
10) निवड झालेल्या उमेदवारास रूपये १००/- किंवा विधीआकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) करारनामा (बॉन्ड) पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारांस करावा लागेल.
11) कुठल्याही कारणास्तव कत्रांटी पध्दतीत निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांने ३० दिवसांची पुर्व सुचना देणे बंधनकारक आहे.

विशेष सुचनाः

1) यापुर्वी संबंधित कार्यालयात किंवा अन्य ठिकाणी सादर केलेले/ प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला किंवा इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे/ स्वीकारणे इत्यादीचा अधिकार दिलेला नाही.
2) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
3) मुलाखतीच्या वेळी आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रती / सांक्षाकित छायांकित प्रती सह उपस्थित रहाणे अनिर्वाय आहे.
4) उमेदवारास पुर्वानुभव असल्यास त्याच्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रतीसह/ सांक्षाकित छायांकित प्रती सह मुलाखतीस उपस्थित रहावे.
5) मुलाखतीचे स्थळ भांडुप संकुल, भरती व प्रशिक्षण केंद्र, दर्गा रोड, खिंडीपाडा, मुलुंड( पश्चिम) मुंबई-४०० ०८२
6) मुलाखती दिनांक ३०/०४/२०२० रोजी सकाळी ९.०० ते सायं.४.०० वाजेपर्यंत घेतल्या जातील.
7) निवडीचे निकष हे उमेदवाराचे दहावीचे एकुण टक्केवारी व मुलाखतीवर आधारीत असतील. तसेच कमी वयाच्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

अर्जाचा नमुना

पदाचे नांवः **कंत्राटी सुरक्षा रक्षक**

| फोटो आकार<br><br>२.५ सेंमी x ३.०० सेंमी |
|---|

प्रति,
मा. प्रमुख सुरक्षा अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल,
वरळी.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षा खात्यातील “कंत्राटी सुरक्षा रक्षक” या पदाकरीता मी खाली सही करणारा विनंती अर्ज सादर करीत आहे.

1) संपुर्ण नांव ( आडनाव प्रथम) मराठीतः
   आडनांव ----------------------
   नांव ----------------------
   वडिलांचे नांव ----------------------
2) पत्ता (पत्रव्यवहाराचा)--------------------------------------------
   --------------------------------------------
3) शैक्षणिक अर्हताः

| परिक्षेचे नांव | प्राप्त झालेले गुण | | | मंडळ/ विद्यापीठाचे नांव |
|---|---|---|---|---|
| | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी | |
| एस.एस.सी. | | | | |

4) भारतीय सैन्य दलातील नियुक्ती दिनांक ---------------------
   भारतीय सैन्य दलातील धारण केलेले पद ---------------------
   भारतीय सैन्य दलातून निवृत्त दिनांक ----------------------
   भारतीय सैन्य दलातून निवृत्तीचे कारण ----------------------

# प्रतिज्ञा पत्र

मी यान्वये प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो कि, वरील माहिती जाणीव पूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. भरती परिपत्रकामध्ये दिलेल्या सर्व निकषांनूसार व शैक्षणिक अर्हतेनूसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे करार झालेला असताना, सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी कोणतीही तक्रार रहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्या विरूध्द कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

दिनांकः------------------ आपला विश्वासू,

सोबतः -----------------------

१) अर्जदाराची सही व नांव

२)

३)